# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

## (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय** - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

**वाचावे** -
1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. कोरोना/ 2020/ प्र.क्र. 58/ आरोग्य 5, दि.14/03/2020
4. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/465/2021, दि. 22/02/2021.
5. या कार्यालयाकडील आदेश क्रं.आव्यमपु/कार्या19अ/199/2021 दिनांक-22/02/2021
6. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमयु/2020/सी.आर.92-डीआयएसएम - 1, दि. 24/02/2021.
7. जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. डी.सी./कार्या 9 ब 1/686/2021, दि. 16/03/2021

| क्र.आव्यमपु/कार्या 19अ/282/2021 | **आदेश** | अहमदनगर दिनांक- 26 /03/2021 |
|---|---|---|

ज्याअर्थी, साथरोग अधिनियम 1897 कलम 2 (1) नुसार जिल्हाधिकारी अहमदनगर यांना अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्रात कोवीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 6 चे आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उघडणे (मिशन बिगीन अगेन) संदर्भातील मार्गदर्शक सूचनांची दि.31/03/2021 पर्यत अंमलबजावणी करणेबाबत आदेशीत केलेले आहे. संदर्भ क्र. 7 अन्वये अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी प्रतिबंधात्मक आदेश लागू करणेत आलेले असून विवाह समारंभास जास्तीत-जास्त 50 व्यक्तींना एकत्र येण्यास निर्बंध असणार नाहीत. तसेच विवाह समारंभाचे ठिकाणी कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 5 अन्वये अहमदनगर जिल्हयातील लग्न समारंभ असलेल्या मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणी 50 व्यक्तीपेक्षा जास्त व्यक्ती उपस्थित राहणे तसेच कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखणेकामी सोशल डिस्टन्सिंग, गर्दीचे व्यवस्थापन, सदर ठिकाणाचे निर्जंतुकीकरण तसेच व-हाडी, पाहुणेमंडळी, मंगल कार्यालयातील कर्मचारी व इतर उपस्थित सर्व व्यक्तीसाठी सॅनिटायझरची उपलब्धता, थर्मल स्कॅनिंग व पल्स ऑक्सीमीटर द्वारे तपासणी व्यवस्था इ. आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे याचे उल्लंघन करणा-या संबंधीत मंगल कार्यालय/मॅरेज हॉल, लॉन्स व इतर लग्न समारंभाचे ठिकाणचे व्यवस्थापन यांचे विरुध्द रक्कम रु. 10000/- इतकी भरपाई रक्कम व फी आकारणे व वसुल करणेकामी अहमदनगर जिल्हयातील पोलीस आस्थापनेवरील पोलीस नाईक ते पोलीस निरीक्षक या दर्जाचे पोलीस अंमलदार यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

Scanned with CamScanner

ज्याअर्थी, अहमदनगर जिल्हयात कोरोना संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देणेकामी जिल्हयामध्ये होणारे लग्न समारंभ व साखरपुडा या सारख्या धार्मिक समारंभाचे ठिकाणी कोविड प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभाविपणे राबविणेकामी लग्न समारंभ व साखरपुडा या सारख्या धार्मिक समारंभाच्या आयोजनापुर्वी प्रशासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर साथरोग अधिनियम 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अहमदनगर जिल्हयात कोरोना विषाणू (कोविड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून **लग्न समारंभ व साखरपुडा या सारख्या धार्मिक समारंभाचे आयोजनास संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणेबाबत या आदेशाव्दारे आदेशित करीत आहे.**

पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी सदर आदेशाचे अनुषंगाने दिलेल्या परवानग्या व उलंघन करणा-या विरुध्द केलेल्या कार्यवाहीबाबतचा दैनंदिन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

कोणतीही व्यक्ती/संस्था/संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास ते साथरोग अधिनियम 1897 मधील तरतूदीनूसार भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

**सदरचा आदेश हा दिनांक 29/03/2021 पासून लागू करणेत येत आहे.**

**स्वाक्षरी /--**
**(डॉ. राजेन्द्र ब. भोसले)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

जिल्हाधिकारी अहमदनगर
सत्यमेव जयते
अहमदनगर

**प्रती**

प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन (सर्व), जि. अहमदनगर

प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - मुख्य कार्यकारी अधिकारी, छावणी मंडळ, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व प्रसिध्दीसाठी.
प्रत - उपविभागीय अधिकारी (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी
प्रत - तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
प्रत - मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व), जि. अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.

**(संदीप निचित)**
**निवासी उपजिल्हाधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**अहमदनगर**

Scanned with CamScanner